2013-14

डायमंड पब्लिकेशन्स

२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट, तिसरा मजला, ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०
दूरध्वनी क्र. : (०२०) २४४५२३८७, २४४६६६४२. ई-मेल : info@diamondbookspune.com

श्री शिवछत्रपती महाविद्यालय
बोडकेनगर, जुन्नर (पुणे)
आवक क्रमांक - 620
दिनांक - 19/11/2013

जावक क्र. डी.पी./२०१३-१४ क्र. ७४

दि. २१-१०-२०१३

प्रति,
माननीय प्राचार्य,
श्री. शिवछत्रपती कॉलेज
जुन्नर

**विषय : दर वर्षीप्रमाणे डिसेंबर २०१३मध्ये 'शैक्षणिक पुस्तक प्रदर्शन' भरविण्यासाठी परवानगीच्या संदर्भात**

महोदय,

डिसेंबर २०१३च्या पहिल्या आठवड्यात गुरुवार, शुक्रवार, शनिवार या दिवशी आम्हाला पुस्तक प्रदर्शनासाठी परवानगी मिळावी, म्हणून हे विनंतीवजा पत्र पाठवत आहोत. पुस्तकांची ने-आण, माणसे इ. खर्च डायमंड पब्लिकेशन्सतर्फे उचलला जाईल. केवळ एक वर्ग, पुस्तके मांडण्यासाठी टेबल यांची उपलब्धता व गेस्ट हाउसवर राहण्याची व्यवस्था आपण करावी. तसेच प्रदर्शनासाठी परवानगी द्यावी, ही विनंती. कळावे.

प्रा. थोरात एल. एन.
२८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत
ग्रंथप्रदर्शन निश्चित करणे
19.11.13

आपला
पाटे द.गं.

दत्तात्रेय गं. पाटे
(डायमंड पब्लिकेशन्सकरिता)

Scanned by CamScanner

ग्रंथालय 251
19-11-13

SSCCJ - 683/2013-14
Date - 19-11-2013

Courier

प्रति,

मा.व्यवस्थापक

डायमंड पब्लिकेशन्स

२६४/३, शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट

तिसरा मजला, ओंकारेश्वर मंदिराजवळ

पुणे - ४११०३०

**विषय - ग्रंथप्रदर्शनाबाबत...**

**संदर्भ - आपले पत्र क्र.डी पी /२०१३-१४/७४ दि.२१/१०/२०१३.**

महोदय,

आपल्या उपरोक्त संदर्भांकीत पत्रानुसार आपणास आमच्या महाविद्याल्यात दि.२९ नोव्हेंबर २०१३ ते दि.२ डिसेंबर २०१३ या कालावधीत ग्रंथप्रदर्शन भरविण्यास परवानगी देण्यात येत आहे. या कालावधीत आपली राहण्याची व्यवस्था महाविद्यालयाच्या गेस्ट हाऊसवर केली जाईल. तसेच प्रदर्शनासाठी हॉल व फर्निचर उपलब्ध करुन दिले जाईल. प्रदर्शनात जास्तीत जास्त व नवनवीन पुस्तके प्रदर्शित करावीत ही विनंती.

कळावे,

आपला,

प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

www.esakal.com

सकाळ

★★ पुणे। शुक्रवार, ६ डिसेंबर २०१३। किंमत ₹ ४

# विद्यार्थ्यांनीही संमेलनात सहभागी व्हावेः कोलते

जुन्नर, ता. ५ : "सासवड (ता. पुरंदर) येथे जानेवारीमध्ये होणाऱ्या ८७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात साहित्यप्रेमी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे," असे आवाहन संमेलनाचे स्वागताध्यक्ष विजय कोलते यांनी केले.

जुन्नर येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयात साहित्य संमेलनातील कार्यक्रम नियोजन आणि सहभागाविषयी विद्यार्थी व प्राध्यापकांना त्यांनी माहिती दिली. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय काळे होते. खजिनदार कांता मस्करे, शरद लेंडे, दशरथ पवार, शिवाजी चाळक, व्ही. बी. कुलकर्णी आदी या वेळी उपस्थित होते.

कोलते म्हणाले, "आचार्य अत्रेंची जन्मभूमी असलेल्या नगरीत व मराठी साहित्यिकांची जन्म व कर्मभूमी असलेल्या पुणे जिल्ह्यात हे संमेलन होत असल्याने या संमेलनास विशेष महत्त्व आहे. ते यशस्वी होण्यासाठी साहित्यप्रेमींचा सहभाग आवश्यक आहे."

महाविद्यालयातून संमेलनास उपस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी बसची सोय करण्याचे आणि प्राध्यापकांना कर्तव्य रजा देण्याची घोषणा ॲड. काळे यांनी या वेळी केली. उपप्राचार्य एल. डी. देवरे यांनी प्रास्ताविक, एस. के. जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला; तर सानिका रोकडे यांनी सूत्रसंचालन केले. ऋतिका बुट्टे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. वंदना नढे यांनी केले.

## जुन्नरमधील ग्रंथप्रदर्शनास वाचकांकडून प्रतिसाद

जुन्नर, ता. ५ : येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयात आयोजित केलेल्या ग्रंथप्रदर्शनास वाचकांकडून प्रतिसाद मिळाला. चार दिवसांत सुमारे तीन हजार ५०० ग्रंथ रसिकांनी प्रदर्शनास भेट दिली. महाविद्यालयाचे ग्रंथालय विभाग व 'डायमंड पब्लिकेशन'ने या प्रदर्शनाचे महाविद्यालयात आयोजन केले होते. माजी प्राचार्य डॉ. कांतिलाल पुराणे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी उपप्राचार्य एल. डी. देवरे, प्रा. व्ही. बी. कुलकर्णी, ग्रंथपाल एल. एन. थोरात. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस.. ई. दरेकर. प्रा. एम. एच. सोमवंशी आदी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय काळे यांच्या प्रेरणेतून दरवर्षी ग्रंथप्रदर्शनाचा उपक्रम राबविला जात असल्याचे या वेळी प्रा. देवरे यांनी सांगितले. वाचक वर्ग ग्रंथवाचनाकडे वळण्यासाठी ग्रंथप्रदर्शनासारखा उपक्रम निश्चित फायदेशीर ठरत असल्याचे 'डायमंड'चे दत्तात्रेय पाष्टे यांनी सांगितले.

Scanned by CamScanner